admn17-18


MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद २००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
वेबसाईट : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र:मकृप/शिक्षण-१/२११७/2226

दिनांक 12 सप्टेंबर,२०१७

## परिपत्रक

विषय:- सन २०१७-१८ या वर्षाच्या कृषी तंत्र पदविका, कृषी तंत्रज्ञान पदविका (Agriculture Polytechnic) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा भरण्याकरिता ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामधील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कृषी तंत्र पदविका, कृषी तंत्रज्ञान पदविका (Agriculture Polytechnic) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाची प्रवेश प्रक्रिया नियोजित वेळापत्रकानुसार दि. २२ ऑगस्ट,२०१७ रोजी पूर्ण झाली. तथापि, सदरील अभ्यासक्रमामध्ये मोठया प्रमाणात जागा रिक्त आहेत. ही बाब विचारात घेता, नवीन प्रवेश अर्ज मागवून गुणवत्तेनुसार प्रत्येक विद्यालयस्तरावर रिक्त जागा भरण्यास मंजुरी मिळण्याबाबत कृषी परिषद कार्यालयाकडे निवेदने प्राप्त झाली होती.

यास्तव कृषी तंत्र पदविका, कृषी तंत्रज्ञान पदविका (Agriculture Polytechnic) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमास प्रवेशोच्छुक उमेदवारांना या परिपत्रकाद्वारे प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. यासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यासाठी प्रवेशोच्छुकांनी खालील बाबी विचारात घ्यावयाच्या आहेत.

१. यापूर्वी ज्या उमेदवारांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर केलेले आहेत व सदर अभ्यासक्रमामध्ये अप्रवेशित आहेत, अशा उमेदवारांना या प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावयाचे असल्यास त्यांनी लॉग इन आयडी व पासवर्डचा वापर करून पुनश्च विकल्प दाखल करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांना प्रवेश प्रक्रियेत स्वारस्य नाही, असे समजून त्यांना प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्यात येणार नाही.

२. ज्या उमेदवारांनी यापूर्वी प्रवेश अर्ज दाखल केलेले आहेत, मात्र पात्रता असूनही काही कारणास्तव प्रवेश अर्ज रद्दबातल झालेले आहेत, अशा उमेदवारांनी अपूर्ण असलेल्या कागदपत्रांची पूर्तता लॉग इन आयडी व पासवर्डचा वापर करून पूर्ण करावी व विकल्प दाखल करावे.

३. ज्या उमेदवारांनी यापूर्वी ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल केलेला नाही, अशा उमेदवारांनी पदविका प्रवेश माहिती पुस्तिका २०१७-१८ मधील मुद्दा क्र. ८ येथे नमूद केलेल्या **'प्रवेश अर्ज भरण्याबाबत उमेदवारांसाठी सूचना'** विचारात घेऊन योग्य त्या शुल्कासह ऑनलाईन प्रवेश अर्ज व विकल्प दाखल करावयाचे आहेत.

वरील अ.क्र. १ ते ३ येथील उमेदवारांची गुणवत्ता, आरक्षण, विकल्प विचारात घेऊन अंतिम राज्यस्तरीय गुणवत्ता यादीच्या आधारे (जिल्हाबंदी न ठेवता) उमेदवारांना प्रवेशाचे वाटप करण्यात येईल. यानंतर जागा रिक्त असल्यास सदरच्या जागा घटक विद्यालयस्तरावर जागेवरील प्रवेश फेरीद्वारे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

यासाठी प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची सुरुवात तसेच प्रवेशासाठी उपलब्ध असलेल्या जागांची संकेतस्थळावर प्रसिध्दी | १३/९/२०१७ |
| २. | ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती स्कॅन केलेली कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावयाचा अंतिम दिनांक | १७/९/२०१७ |

| | | |
|---|---|---|
| ३. | तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | १९/९/२०१७ |
| ४. | ऑनलाईन तक्रार नोंदणीचा अंतिम दिनांक | २१/९/२०१७ |
| ५. | अंतिम राज्यस्तरीय गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | २३/९/२०१७ |
| ६. | राज्यस्तरीय गुणवत्ता यादीच्या आधारे (जिल्हाबंदी न ठेवता) पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | २५/९/२०१७ |
| ७. | संबंधित विद्यालयात उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | २७/९/२०१७ |
| ८. | राज्यस्तरीय गुणवत्ता यादीनुसार घटक विद्यालयस्तरावर / विद्यापीठस्तरावर भरावयाच्या रिक्त जागांच्या तपशिलाची संकेतस्थळावर प्रसिध्दी | २८/०९/२०१७ |
| ९. | राज्यस्तरीय गुणवत्ता यादीनुसार विद्यापीठस्तरीय जागेवरील प्रवेश फेरी (दि. १/१०/२०१७ रोजी रूपांतरासह) व व्यवस्थापन कोटयातील जागांवर प्रवेश फेरीचा कालावधी | २९/०९/२०१७ व १/१०/२०१७ |
| १०. | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | ०३/१०/२०१७ |

या परिपत्रकाद्वारे सर्व विद्यालयांना सूचित करण्यात येते की, जादा वर्ग आयोजित करून विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा.

महासंचालक

प्रति,

१. मा. कुलगुरु / कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी.

२. सहयोगी अधिष्ठाता (निकृशि), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर / डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी.

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच कृषी विद्यापीठाच्या सूचना फलकांवर परिपत्रकास प्रसिध्दी द्यावी. याचबरोबर आपल्या कृषी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व कृषी तंत्र विद्यालये / कृषी तंत्र निकेतने यांना त्यांच्यास्तरावर स्वखर्चाने स्थानिक वर्तमानपत्रातून त्वरीत प्रसिध्दी देण्याबाबत ई-मेलद्वारे सूचित करावे.

३. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, कृषी तंत्र पदविका, कृषी तंत्रज्ञान पदविका (Agriculture Polytechnic) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका पदवी अभ्यासक्रमाच्या वरील प्रवेश कार्यपध्दतीविषयी सर्व विद्यालयांना तसेच प्रवेशोच्छुकांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे तसेच ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

४. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, ई-१४, वर्ल्ड ऑफ मदर कॉम्प्लेक्स, जय गणेश व्हिजन, आकुर्डी, पुणे ४११ ०३५.

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर सदर परिपत्रक प्रसिध्द करण्यात यावे.